# महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई

(महाराष्ट्र शासनाच्या अंगिकृत उपक्रम)

सत्यमेव जयते

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, मर्यादित, मुंबई

## सूचना

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (म.फु.मा.वि.म.) राज्याच्या अनुसूचित जाती व दुर्बल घटकांच्या विकास व कल्याणासाठी काम करत आहे.

महामंडळाच्या मुंबईतील कार्यालयामध्ये प्राथमिक चौकशी, अधिकारी म्हणून तयार करावयाच्या पॅनेलमध्ये समावेशासाठी, महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या इच्छुक अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक अधिकाऱ्यांनी **दि. २१.०७.२०२२** पर्यंत अर्ज करावेत. अधिक माहितीकरिता कृपया **https://mpbcdc.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर भेट द्यावी.

**महाव्यवस्थापक (प्रशासन)**
**म.फु.मा.वि.महामंडळ, मुंबई**

**8X6**

# सूचना

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (म.फु.मा.वि.म.) राज्याच्या अनुसूचित जाती व दुर्बल घटकाच्या विकास व कल्याणासाठी काम करत आहे.

महामंडळाच्या मुंबईतील कार्यालयामध्ये प्राथमिक चौकशी अधिकारी म्हणून तयार करावयाच्या पॅनेलमध्ये समावेशासाठी, महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या इच्छुक अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक अधिकाऱ्यांनी दि. २१/०७/२०२२ पर्यत अर्ज करावेत. अधिक माहितीकरिता कृपया https://mpbcdc.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.

महाव्यवस्थापक (प्रशासन)
म.फु.मा.वि.महामंडळ, मुंबई.

# महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादीत

दुरध्वनी क्र. ०२२-२६२०२८५२

जुहू सुप्रिम शॉपिंग सेंटर, गुलमोहर क्रॉस
रोड, क्र. ९, जे.व्ही.पी.डी. स्कीम,
जुहू, मुंबई - ४०००४९
दि. ०८/०७/२०२२

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची (म.फु.मा.वि.म.) दिनांक १० जुलै,१९७८ रोजी स्थापना करण्यांत आली आहे. सदरहू महामंडळ कंपनी कायदा १९५६ अंतर्गत नोंदणीकृत करण्यांत आली असून राज्याच्या अनुसूचित जाती व दुर्बल घटकाच्या विकास व कल्याणासाठी हे महामंडळ काम करीत आहे. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या आस्थापनेवरील वरीष्ठ अधिकाऱ्यांविरुध्द प्राप्त तक्रार अर्ज / निवेदनांची प्राथमिक चौकशी करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून सहसचिव दर्जापेक्षा कमी नसलेल्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या (वेतनश्रेणी रु. ३७४००-६७००० + ग्रेड पे रु. ८७००/-) व सेवाकालावधीमध्ये चौकशी प्रकरणे हाताळलेल्या अधिकाऱ्यांचे, पॅनेल तयार करावयाचे असून या पॅनेलमध्ये समावेश करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

<u>**पात्रता आणि कमाल वयोमर्यादा**</u> :

(१) भारतीय नागरीकत्व (महाराष्ट्राचे अधिवासी)

(२) अर्जदार हे शारीरीक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावेत तसेच त्यांच्याविरुद्ध कोणतेही फौजदारी गुन्ह्याचे प्रकरण सुरु/प्रलंबित नसावे.

(३) पॅनेलवर नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त चौकशी अधिकाऱ्याचे वय त्या वर्षाच्या दिनांक १ जुलै रोजी ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

(४) पॅनेलमध्ये समाविष्ट करण्यासाठीच्या अटी व शर्ती सोबतच्या **परिशिष्ट-अ** मध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

(५) विहित नमुन्यातील अर्ज स्वीकारण्याचा शेवटचा दि. २१ जुलै २०२२ संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत आहे. विहीत तारीख/वेळेनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

(६) कोणतीही कारणे न देता सदरहू पॅनेल तयार करण्याची कार्यवाही स्थगित करणे / रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार तसेच प्राप्त अर्ज अंशतः किंवा पूर्ण किंवा सर्व अर्ज स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.

(७) अर्जासोबत कोणतेही मूळ प्रमाणपत्र जोडण्यात येऊ नयेत.

(८) अर्जासोबत मुळ प्रमाणपत्रांच्या छायाप्रती जोडण्यात याव्यात. छायाप्रती स्वयंसाक्षांकीत (Self Attested) करण्यात याव्यात. अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती स्पष्ट आणि सुवाच्य असाव्यात. अपात्र / अस्पष्ट प्रती किंवा अंशतः दाखल केलेले / सदोष अर्ज सरसकट नाकारले जातील.

(९) मुलाखतीसाठी/चाचणीसाठी आमंत्रित करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता/ निवास भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.

(१०) इच्छुक अधिकाऱ्यांनी सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-ब** नुसार त्यांचे विहीत नमुन्यातील अर्ज, वयाचा दाखला, सेवानिवृत्तीविषयक आवश्यक प्रमाणपत्रे इत्यादी कागदपत्रे, मा.महाव्यवस्थापक (प्रशासन), जुहू सुप्रिम शॉपिंग सेंटर, गुलमोहर क्रॉस रोड, क्र. ९, जे.व्ही.पी.डी. स्कीम, जुहू, मुंबई - ४०००४९ या पत्यावर टपालाने/कुरीअरद्वारे/स्वहस्ते सादर करावीत. अधिकाऱ्यांना अर्जाची आगाऊ प्रत gm@mpbcdc.in वर ई-मेलद्वारे पाठवता येईल.

******

## परिशिष्ट-अ

सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना **प्राथमिक चौकशी अधिकारी** म्हणून नियुक्त करण्यासाठीच्या अटी व शर्ती :

(१) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या आस्थापनेवरील वरीष्ठ अधिकाऱ्यांविरुध्द प्राप्त तक्रार अर्ज / निवेदनांची प्राथमिक चौकशी करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून सहसचिव दर्जापेक्षा कमी नसलेल्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या (वेतनश्रेणी रु. ३७४००-६७००० ग्रेड पे रु. ८७००/-) व सेवाकालावधीमध्ये चौकशी प्रकरणे हाताळलेल्या अधिकाऱ्यांचा, पॅनेलमध्ये समावेश करण्यात येणार आहे.

(२) चौकशी कामासाठी नियुक्त करावयाच्या पॅनेलमधील समाविष्ट अधिकाऱ्यांस "प्राथमिक चौकशी अधिकारी" म्हणून संबोधण्यात यावे.

(३) पॅनेलवर नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त चौकशी अधिकाऱ्याचे वय त्या वर्षाच्या दिनांक १ जुलै रोजी ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

(४) प्राथमिक चौकशी अधिकारी हा शारिरीक, मानसिक आरोग्याच्यादृष्टीने सक्षम असावा.

(५) प्राथमिक चौकशी अधिकारी म्हणून कर्तव्य पार पाडण्यात व्यत्यय निर्माण होईल , अशा कोणत्याही व्यावसायिक कामात किंवा सेवेत प्राथमिक चौकशी अधिकारी गुंतलेला नसावा.

(६) विभाग प्रमुखांकडून "केस टू केस" या तत्वावर एका प्राथमिक चौकशी अधिकाऱ्यांकडे कमाल ६ प्रकरणे सोपविण्यात येतील.

(७) प्राथमिक चौकशी अधिकाऱ्याने चौकशी प्रकरणासंदर्भात त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे / माहिती / साधनसामग्रीबाबत गोपनियता पाळावी आणि त्याचा वापर केवळ त्यांना सोपविण्यात आलेल्या प्रकरणाच्या चौकशीसाठीच करावा.

(८) प्राथमिक चौकशी अधिकारी यांनी चौकशी कामकाज चालू असताना किंवा चौकशी अहवाल सादर केल्यानंतर अशी कोणतीही कागदपत्रे / माहिती किंवा साधनसामग्री उघड करता कामा नये.

(९) प्राथमिक चौकशी अधिकाऱ्याने त्यांना सोपविलेल्या चौकशी प्रकरणाच्या सर्व नोंदी / कागदपत्रे / कामकाज इ . बाबत गुप्तता व गोपनियता बाळगावी. प्राथमिक चौकशी अधिकारी यांनी चौकशी अहवाल सादर करताना त्या प्रकरणाच्या सर्व नोंदी, अहवाल इत्यादी त्यांना प्राथमिक चौकशी अधिकारी म्हणून नेमणाऱ्या प्राधिकाऱ्याकडे सोपवावीत.

(१०) महामंडळातील गट - अ व गट- ब च्या एका अधिकाऱ्याच्या, एका विषयाच्या चौकशी प्रकरणी प्राथमिक चौकशी अधिकारी यांना पारिश्रमिकापोटी रु. ५०००/- ( रुपये पाच हजार मात्र) एवढी ठोक रक्कम मंजूर करण्यात येईल. तसेच एकाच विषयाच्या प्रकरणामध्ये एकापेक्षा अधिक अधिकारी समाविष्ट असणाऱ्या चौकशी प्रकरणी, प्राथमिक चौकशी अधिकारी यांना पारिश्रमिकापोटी रु .८०००/- ( रुपये आठ हजार फक्त) एवढी ठोक रक्कम मंजूर करण्यात येईल.

(११) वरील पारिश्रमिकाव्यतिरिक्त प्राथमिक चौकशीच्या कामासाठी चौकशी अधिकाऱ्यांना इतर कोणतीही रक्कम अनुज्ञेय असणार नाही.

(१२) प्राथमिक चौकशीचे कामकाज महामंडळाच्या मुख्यालयात किंवा प्रभारी अधिकाऱ्यांच्या कार्यालयात पार पाडण्यात यावे. अपवादात्मक किंवा टाळता न येणाऱ्या परिस्थितीत चौकशीच्या कामानिमित्ताने प्राथमिक चौकशी अधिकारी यांना मुंबई महानगर प्रदेशाच्या बाहेर प्रवास करावा लागल्यास सेवेत समकक्ष पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना देय असणाऱ्या दराप्रमाणेच प्राथमिक चौकशी अधिकारी यांना प्रवासभत्ता / दैनिक भत्ता देय राहील.

(१३) प्राथमिक चौकशी अधिकारी यांना चौकशीच्या कामकाजासाठी आवश्यक फर्निचर व कुलुपे असलेले कपाट, आवश्यक स्टेशनरी / पोस्टेज तिकिटे महामंडळाच्या कार्यालयाातून पुरविण्यात येतील.

(१४) महामंडळाला कोणत्याही वेळी , कोणतेही कारण न देता आणि कोणतीही नोटीस न देता, प्राथमिक चौकशी अधिकारी यांची सेवा समाप्त करता येईल.

(१५) प्राथमिक चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे प्राथमिक चौकशीसाठी देण्यात आलेल्या प्रकरणाची चौकशी, सर्वसाधारणपणे एक महिन्याच्या आत किंवा महामंडळाकडून देण्यात येणाऱ्या कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक राहील.

(१६) प्राथमिक चौकशी अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या प्रकरणाचा प्राथमिक चौकशी अहवाल सिलबंद लिफाफ्यात मा. व्यवस्थापकीय संचालक, म.फु.मा.वि.महामंडळ यांच्याकडे सादर करावा.

*******

फोटो

# परिशिष्ट-ब

## सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना प्राथमिक चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यासाठी तयार करावयाच्या पॅनेलमध्ये समावेशासाठी अर्ज

| | |
|---|---|
| संपूर्ण नाव | |
| जन्मतारीख | |
| संपर्काचा पत्ता | |
| कायमचा पत्ता | |
| मोबाईल क्र. | |
| ई-मेल | |
| आधार कार्ड क्र. | |
| पॅनकार्ड क्र. | |
| सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद व वेतनश्रेणी | |
| सेवानिवृत्तीच्या वेळच्या कार्यालयाचे नाव | |
| चौकशी प्रकरणे हाताळण्याबाबतचा अनुभव असल्यास त्याचा तपशिल | |

वरीलप्रमाणे सादर केलेली माहिती खरी आहे. मी सादर करीत असलेल्या पदाच्या सर्व अटी व शर्ती वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. त्यानुसार हा अर्ज मी सादर करीत आहे.

नाव व स्वाक्षरी / दिनांक